क्रमांक : २४०८४ / क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, नागपूर.
दिनांक : २१ डिसेंबर, २०२४.

**संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्र.२३५९३/क-१, दिनांक १३ डिसेंबर, २०२४**

**:: कार्यालयीन आदेश ::**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या नागपूर कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधीमंडळाच्या (हिवाळी) अधिवेशन सन-२०२४ च्या कामासाठी नागपूर येथे आलेल्या व संपूर्ण अधिवेशन कालावधीमध्ये नागपूर येथे वास्तव्य केलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना **गुरूवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२४ रोजी सुट्टी देण्यात येत आहे.**

तसेच उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये रविवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२४ रोजी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यालयीन कामकाजाकरिता कार्यालयात उपस्थित राहिलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना उक्त **दिवसाची बदली रजा शुक्रवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२४ रोजी देण्यात येत आहे.**

आदेशानुसार,

**( सुभाष नलावडे )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय.
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
५) मा. सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
६) मा.सचिव-२ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
८) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
९) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.
११) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कर्मचारी.
१२) 'क-२' संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१३) व्यवस्थापक, उपहारगृह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१४) निवडनस्ती.

**टीप :- गुरूवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२४ व शुक्रवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२४ रोजी कार्यालयीन कामाकरिता उपस्थित राहणाऱ्या 'ग-१' कक्ष,'ग-२' व 'ह' कक्षातील संबंधित कर्मचाऱ्यांना त्या दिवसाची बदली सुट्टी त्यांच्या विनंतीनुसार देय राहील.**